# प्रसिध्दीपत्रक (प्रेसनोट)

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामाच्या स्वरुपात बदल झालेला असल्याने पोलीस शिपाई पदावर बुध्दीमान उमेदवारांची निवड होण्याची आवश्यकता, पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील शारिरीक चाचणीदरम्यान होणाऱ्या दुर्घटना याबाबी विचारात घेऊन शासनाने शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, दिनांक १८/०१/२०१९ व सेप्रनि-१८१८/प्र.क्र. ३१३/पोल-५अ, दिनांक १८/०१/२०१९ अन्वये भरती प्रक्रियेत बदल केलेला आहे. नवीन पध्दतीमुळे पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची लेखी परिक्षा प्रथम घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थपनेवर रिक्त होणाऱ्या पदांच्या प्रमाणात आवश्यक तेवढयाच योग्य उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी बोलविण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रिया दीर्घकाळ सुरु न राहता जलद गतीने पार पडेल. त्यामुळे जिल्हयाबाहेरील उमेदवारांना जास्त दिवस ताटकळत रहावे लागणार नाही. भरती प्रक्रियेत केलेल्या बदलांचा फायदा उमेदवारांना निश्चितच होईल.

( संतोष रस्तोगी )
सह पोलीस आयुक्त (प्रशासन),
बृहन्मुंबई.

Scanned by CamScanner